13 JUN 2018
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पक्षीतीर्थ रंकाळा संवर्धनाचा निर्धार

## लोकचळवळीत शिवाजी विद्यापीठाचाही सक्रिय सहभाग

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : 'सकाळ' आणि रंकाळा ग्रुपच्या पुढाकाराने आज उत्स्फूर्त गर्दीच्या साक्षीने रंकाळ्यावर वृक्षारोपण व सात वर्षांपूर्वी लावलेल्या झाडांचे वाढदिवस झाले. नवनाथ मंदिर परिसरात कदंबाच्या साक्षीने हा सोहळा सजला. महापौर शोभा बोंद्रे, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान, कोल्हापूरकरांचा श्वास असलेल्या रंकाळ्याचा शिवाजी विद्यापीठ सर्वांगीण अभ्यास करून शास्त्रोक्त मार्गदर्शन देणार आहे. त्यानंतर शास्त्रीय पद्धतीने रंकाळा संवर्धनासाठी प्रयत्न होणार आहे.

'सकाळ'च्या 'चला, झाडे लावूया' उपक्रमातून सात वर्षांपूर्वी रंकाळ्यावर लोकचळवळ उभी राहिली. त्यातूनच रंकाळा तलाव आणि परिसराच्या संवर्धनासाठी यापूर्वी ४० पानांचा आराखडा तज्ज्ञांनी तयार केला आहे. मात्र, तांत्रिक बाबींसाठी शिवाजी विद्यापीठाचा सक्रिय सहभाग आवश्यक असून, तमाम रंकाळाप्रेमींच्या वतीने डॉ. अमर अडके यांनी याबाबतचा प्रस्ताव मांडला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी हा प्रस्ताव मान्य केला.

'सकाळ'चे निवासी संपादक डॉ. श्रीरंग गायकवाड म्हणाले, ''आपल्या संत परंपरेनेच वृक्षाची महती सांगितली आहे आणि म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांनीही वृक्षसंपदेबाबतची आज्ञापत्रे काढली. रंकाळा ग्रुपची ही चळवळ प्रेरणादायी असून, ती भविष्यात अधिक व्यापक करण्यासाठी 'सकाळ' नक्कीच पाठबळ देईल.''

कुंभी-कासारी साखर कारखान्यातर्फे रंकाळा चळवळीसाठी आवश्यक सर्वतोपरी सहकार्याची ग्वाही यावेळी आमदार चंद्रदीप नरके यांनी दिली. अशोक देसाई यांनी गेल्या सात वर्षांतील रंकाळा चळवळीची माहिती दिली. 'सकाळ'चे उपसरव्यवस्थापक रवींद्र रायकर, नगरसेवक राहुल माने, माजी उपमहापौर विक्रम जरग, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संजय पवार, पंडितराव बोंद्रे, प्राचार्य अजय दळवी, रवी चौगुले, अभय देशपांडे, राजशेखर तंबाखे, बी. एम. चौगले, विजय औंधकर, अमर सरनाईक, राजेश कोगनूळकर, सुहास साळोखे, विक्रम कुलकर्णी आदी यावेळी उपस्थित होते. विजयराव सावंत, राजेंद्र पाटील, अभिजित चौगले, संजय मांगलेकर, प्रा. एस. पी. चौगले, सुधीर राऊत, यशवंत पाटील, किरण पडवळ, जितेंद्र लोहार, प्रवीण वायचळ, नीता साळोखे, मीनल भालेकर आदींनी संयोजन केले. विकास जाधव यांनी आभार मानले.



कोल्हापूर : रंकाळा ग्रुप व 'सकाळ'च्या पुढाकाराने मंगळवारी रंकाळ्यावर वृक्षारोपण व लावलेल्या झाडांचा वाढदिवस साजरा झाला. यावेळी विक्रम जरग, 'सकाळ'चे निवासी संपादक डॉ. श्रीरंग गायकवाड, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, महापौर शोभा बोंद्रे, आमदार चंद्रदीप नरके, डॉ. अमर अडके, संजय पवार, अशोक देसाई, राहुल माने, अभय देशपांडे आदी. (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

सकाळच्या प्रकल्प सकाळच्या संकल्प

सकाळ सोशल फाऊंडेशन सामाजिक सेतू

> रंकाळा संवर्धनासाठी महापालिका पातळीवर वेळोवेळी प्रयत्न सुरू आहेतच. येत्या काळातही सर्वतोपरी सहकार्य महापालिका देईल.
> – शोभा बोंद्रे, महापौर

> रंकाळा संवर्धनाची चळवळ आदर्शवत आहे. ती अधिक नेटाने पुढे नेण्यासाठी शिवाजी विद्यापीठ आवश्यक ती सर्व मदत देईल.
> – डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू

### दृष्टिक्षेपात वाढदिवस

- श्रीकांत कदम (भैया), शिवशाहीर राजू राऊत, अजित मोरे-मेस्त्री, सुधीर गांधी, सुनील राऊत या रंकाळाप्रेमींचा रंकाळा चळवळीतर्फे सन्मानचिन्ह देऊन झाला गौरव
- माधुरी बेकरीचे चंद्रकांत वडगावकर व परिवारातर्फे रंकाळ्याच्या छायाचित्रासह वाढदिवसासाठी आकर्षक केक
- बोधीवृक्ष परिसरात बैठकीसाठी बेंच बसवण्यात आले आहेत. या झाडाखाली अधिक ऑक्सिजन मिळण्यास मदत होते.

व्हिडिओ पाहा
www.facebook.com/kolhapursakal

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

13 JUN 2018
लोकमत

**देवानंद शिंदे : राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठातर्फे सत्कार**

# यादव यांची संशोधनाप्रती समर्पणवृत्ती आदर्शवत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ज्येष्ठ वनस्पतिशास्त्रज्ञ प्रा. एस. आर. यादव यांची संशोधनाप्रती समर्पण वृत्ती आणि निष्ठा ही आदर्शवत आहे. त्यांना मिळालेला 'राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार' हा शिवाजी विद्यापीठाचा गौरव आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शुक्रवारी येथे केले.

विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र अधिविभागाचे माजी प्रमुख व वनस्पतिशास्त्रज्ञ प्रा. डॉ. एस. आर. यादव यांना केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायू परिवर्तन मंत्रालयातर्फे 'इ. के. जानकी अम्मल जीवनगौरव पुरस्कार' हा संशोधनातील सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार केंद्रीय आरोग्यमंत्री डॉ. हर्षवर्धन यांच्या हस्ते प्रदान करून सन्मानित केले. हा पुरस्कार मिळविणारे डॉ. यादव हे राज्यातील एकमेव संशोधक आहेत. त्यानिमित्त शुक्रवारी विद्यापीठातर्फे डॉ. यादव यांचे अभिनंदन केले. यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते.

या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते विद्यापीठातर्फे प्रशंसापत्र व ग्रंथभेट देऊन डॉ. यादव यांचा गौरव करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे, वनस्पतिशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. डी. के. गायकवाड, एस. एस. कांबळे, एन. एस. चव्हाण, आर. व्ही. गुरव, एन. बी. गायकवाड, व्ही. डी. जाधव, के. बी. पवार, एम. एम. लेखक, एस. जी. घारे, एम. एस. निंबाळकर, उपकुलसचिव जी. एस. कुलकर्णी, आदी उपस्थित होते.



केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाचा जीवनगौरव पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल प्रा. डॉ. एस. आर. यादव यांचे प्रशस्तीपत्र व ग्रंथभेट देऊन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शुक्रवारी अभिनंदन केले. यावेळी शेजारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आदी उपस्थित होते.

**मातृसंस्थेमुळेच घडलो**

राष्ट्रीय स्तरावरील इतक्या उंचीचा पुरस्कार हा केवळ माझी मातृसंस्था असलेल्या शिवाजी विद्यापीठामुळेच मिळू शकला. या मातृसंस्थेमुळेच मी घडलो. असे प्रतिपादन प्रा. डॉ. यादव यांनी यावेळी केले.

जनसंपर्क कक्ष

1 3 JUN 2018 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'नीम' अंतर्गत भरणार शिवाजी विद्यापीठात पदे



> प्रयोगशाळा परिचर, ऑफिस असिस्टंट, मदतनीस ही पदे भरली जाणार आहेत. 'नीम' अंतर्गत भरल्या जाणाऱ्या पदांचा विमा उतरविला जाणार आहे.
>
> – डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू

**कोल्हापूर, ता. १२ :** शिवाजी विद्यापीठातील काही रिक्त पदे नॅशनल इम्पलॉयबिलिटी ऑफ इनहान्समेंट मिशन (नीम) रेग्युलेशन अंतर्गत भरण्यास व्यवस्थापन परिषदेत आज मान्यता दिली. किमान सहा महिने व जास्तीत जास्त तीन वर्षे पदांवर काम करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.

या पदांवर कामातून त्यांचे 'स्किल' वाढावे, हा हेतू असल्याचे सांगण्यात येते. परदेशी विद्यार्थ्यांना विद्यापीठातील विविध अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांत पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश देण्याबाबतच्या नियमावलीस मान्यता देण्यात आली. एम. बी. ए. युनिटमध्ये पी. जी. डिप्लोमा इन ई-बिझनेस, दूर शिक्षण केंद्रांतर्गत बी. ए. होम सायन्स, एम. ए. सायकॉलॉजी व एम. पी. एड. अभ्यासक्रम सुरू करण्यासही मान्यता दिली आहे. तसेच अधिविभागांत अॅडजंक्ट प्रोफेसर, रिसर्च प्रोफेसरांची नेमणूक करण्यासह विद्यापीठ व आयआयजीएम (नवी मुंबई) यांच्यातील सामंजस्य कराराच्या नूतनीकरणासही मान्यता देण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUN 2018
लोकमत

# विद्यापीठात चार नवे अभ्यासक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बी. ए. होम सायन्स, पी. जी. डिप्लोमा इन ई-बिझनेस, एम. ए. सायकॉलॉजी आणि एमपीएड् हे नवे अभ्यासक्रम सुरू करण्यास शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने मंगळवारी मान्यता दिली.

व्यवस्थापन परिषदेची बैठक विद्यापीठ कार्यालयात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्या उपस्थितीत झाली. सदस्य सचिवपदी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर होते. परदेशी विद्यार्थ्यांना विविध अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांमध्ये पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, आदी अभ्यासक्रमांना प्रवेश देण्याबाबतच्या नियमावलीस मान्यता देण्यात आली. एमबीए युनिटमध्ये २०१८-१९ पासून पी. जी. डिप्लोमा इन ई-बिझनेस, दूरशिक्षण केंद्राअंतर्गत एम. ए. सायकॉलॉजी, एमपीएड्ला मान्यता दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUN 2018
पुढारी

# परदेशी विद्यार्थ्यांना विद्यापीठ प्रवेशासाठी नियमावलीस मान्यता

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** परदेशी विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांमध्ये पदविका, पदवी, पदव्युत्तर, पदवी आदी अभ्यासक्रमांना व्यवस्थापन परिषद बैठकीत मंगळवारी मान्यता मिळाली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, तर सचिवपदी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. यावेळी एमबीए युनिटमध्ये २०१८-१९ पासून पी. जी. डिप्लोमा इन बिझनेस कोर्स, दूर शिक्षण केंद्रांतर्गत बी. ए. होम सायन्स कोर्स, एम. ए. मानसशास्त्र व एम.पी.एड. आदींना मान्यता दिली. नॅशनल इम्प्लॉयबिलिटी ऑफ एनहान्समेंट मिशन रेग्युलर २०१७ अंतर्गत विद्यापीठाच्या पदांना मान्यता मिळाली. आयआयजीएम नवी मुंबईसमवेत सामंजस्य कराराच्या नूतनीकरणास मान्यता देण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUIN 2018
पुढारी

# प्रा. नंदकुमार काटकर यांचा सत्कार

कोल्हापूर : मराठी चंदगडी बोलीला मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणारे शिवाजी विद्यापीठातील प्रा. नंदकुमार मोरे यांचा सत्कार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आला. याबाबत शिवसेनेच्या वतीने पुढाकार घेण्यात आला. दुर्गम व डोंगराळ तालुका असलेल्या चंदगड तालुक्यातील चंदगडी बोलीसाठी प्रा. मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले. भाषातज्ज्ञ डॉ. गणेशदेवी यांच्या संशोधन व संपादित केलेल्या 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण' या पुस्तकात या बोलीला चौथे स्थान मिळाले आहे. सत्कार कार्यक्रमावेळी जिल्हाप्रमुख संजय पवार, विजय देवणे, रवी चौगुले, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUN 2018
पुण्यनगरी

# एमसीए प्रवेश प्रक्रियेस १३८ विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातील एमसीए प्रवेश परीक्षा मंगळवारी घेण्यात आली. विद्यापीठाचा डिपार्टमेंट ऑफ कॉम्प्युटर सायन्स आणि कसबा बावडा येथील डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे ही परीक्षा झाली. परीक्षेसाठी एकूण १५३ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. त्यापैकी १३८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर १५ विद्यार्थी परीक्षेस अनुपस्थित राहिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

13 JUN 2018
महाराष्ट्र टाईम्स

## तिसरा डोळा



ऋतुजा भुईंगडे, कोल्हापूर